अमरावती महानगरपालिका,अमरावती.
जा.क्र.अमनपा/आयु/बावप/२५८/२०२२
दिनांक :- ०८.०६.२०२२

**<u>आदेश</u>**

**<u>वाचा</u> :- १) मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल पी.आय.एल.क्रमांक १५५/२०११ संदर्भात दि.०६.०८.२०१४ व दि.३१.०१.२०१७ रोजी पारीत केलेले आदेश.**
**२) जा.क्र.अमनपा/आयु/बावप/४००/२०१४,दि.१६.०८.२०१४ रोजी निर्गमीत आदेश.**

मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल पी.आय.एल.क्रमांक १५५/२०११ संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.०६.०८.२०१४ रोजी पारीत केलेले आदेशांस अनुसरुन उक्त नमुद आदेश निर्गमीत करण्यात आले होते. उक्त नमुद क्र.१ आदेशामधिल क्र.२८ a) अन्वये खालील नमुद संपुर्ण कार्यवाही झोन स्तरावर करावयाची आहे.

तथापि सदर आदेश क्र.१ मधिल अ.क्र.४ अन्वये मे.सेल ॲडस् (तत्कालीन जाहिरात कंत्राटदार) यांनी महानगरपालिकेने दि.११.०२.२०१३ रोजी त्यांचे समवेत केलेले करारनाम्यानुसार त्यांना शहरातील अनधिकृत जाहिराती हटविणे व तत्सम कारवाई करावयाची होती. सबब मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेशानुसार मनपा अंतर्गत पाचही झोन चे संबंधित सहाय्यक आयुक्त यांचेशी सपर्क साधुन व समन्वय ठेवुन सेल ॲड्स यांना सहायक आयुक्त यांचे आदेशाप्रमाणे कारवाई करावयाची आहे,असे नमुद होते. परंतु दि.०१.०७.२०१७ रोजी GST लागु झाल्यांनंतर संदर कंत्राट रद्द करण्यात आला होता.

सबब,**जा.क्र.अमनपा/आयु/बावप/४००/२०१४,दिनांक १६.०८.२०१४ रोजी निर्गमीत आदेशामध्ये** दुरुस्ती करण्यात येत असुन उक्त नमुद अ.क्र.४ मध्ये मे.सेल ॲड्स (तत्कालीन जाहिरात कंत्राटदार) ऐवजी उक्त नमुद क्र.१ अन्वये पारीत आदेशामधिल a to z मध्ये नमुद निर्देशांची अमरावती महानगरपालिका क्षेत्रामधिल संबंधित पाचही झोन चे सहाय्यक आयुक्त हे संबंधित झोन स्तरावर पथक तयार करुन अतिक्रमण विभागातील पथक व यंत्रणेचे सहाय्याने आवश्यक्तेनुसार कारवाई करुन अंमलबजावणी करतील.

१) उक्त नमुद क्र.१ आदेशामधिल क्र.२८ a) अन्वये उपआयुक्त (सामान्य),म.न.पा.अमरावती यांची शहरातील अनधिकृत जाहिराती हटविणे व त्यासंदर्भात संपुर्ण कार्यवाहीवर नियंत्रण करण्यास्तव प्राधिकृत अधिकारी (नोडल ऑफीसर) म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. या संदर्भात ते खालील प्रमाणे कर्तव्ये व जबाबदारी पार पाडतील.

I. मा.उच्च न्यायालयाने अनधिकृत जाहिरातीसंबंधात दि.०६.०८.२०१४ रोजी दिलेले आदेशान्वये झोन स्तरावर हटविले जाणारे जाहिराती व त्या संदर्भात संबंधित सहाय्यक आयुक्त यांनी करावयाची कार्यवाही बाबत उपआयुक्त (सामान्य) हे नियंत्रण ठेवतील व त्याकरीता सर्वस्वी जबाबदार राहतील.

२) महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पाचही झोन चे संबंधित सहाय्यक आयुक्त यांची त्यांचे झोन अंतर्गत न्यायालयाने अनधिकृत जाहिरातींसंबंधात दिलेले आदेशाप्रमाणे करावयाचे कार्यवाही करीतां प्राधिकृत अधिकारी (नोडल ऑफीसर) म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. या संदर्भात ते खालील प्रमाणे कर्तव्ये व जबाबदारी पार पाडतील.

I. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २४४ व २४५ अंतर्गत जाहिरात संबंधी असलेले तरतुदींप्रमाणे संपुर्ण कार्यवाही करण्याची जबाबदारी मा.न्यायालयाचे आदेशान्वये संबंधित सहाय्यक आयुक्त यांना पार पाडावयाची आहे.

II. सहाय्यक आयुक्त यांना त्यांचे झोन अंतर्गत येणा-या क्षेत्रातील सर्व अनधिकृत जाहिराती संबंधी मालमत्ता विरुपण प्रतिबंधक कायदा १९९५ अंतर्गत तरतुदींनुसार कारवाई करावयाची आहे. तसेच झोन क्षेत्रांतर्गत मालमत्ता विरुपण प्रतिबंधक कायदा ११९५ चे तरतुदींचा भंग झाल्याचे आढळल्यास त्वरीत त्यासंबंधीची माहिती संबंधित पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अथवा चार्ज वरील अधिकारी यांना तसेच महसुल यंत्रणेचे नोडल अधिकारी यांना द्यावयाची आहे.

III. मा.न्यायालयाचे आदेशान्वये झोन अंतर्गत अनधिकृत जाहिरातींवर कार्यवाही करतांना सदर झोन अंतर्गत येणारे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे वेळोवेळी आवश्यक व पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देतील. तसेच कमीत कमी २ शस्त्रधारी पोलीस शिपाई हे कर्मचा-यांसोबत कारवाई करतांना संरक्षणा करीता राहतील.

IV. जर सहाय्यक आयुक्त यांना संबंधित ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी बंदोबस्त देण्याकरीता हयगय अथवा नकार दिल्यास त्यांना पोलीस आयुक्त यांनी नियुक्त केंलेले नोडल पोलीस उपआयुक्त यांचे कडे या संबंधी तक्रार करावी.

V. सहाय्यक आयुक्त यांनी प्रत्येक झोन स्तरावर नागरीकांचा सहभाग असलेली एक समिती स्थापन करावयाची आहे. सदर समितीचे सदस्य हे झोन क्षेत्रात लावण्यात येणारे अनधिकृत जाहिरातींवर लक्ष ठेवुन मनपा अधिका-यांना याबाबत अवगत करतील व त्या आधारे कारवाई करावयाची आहे.

VI. झोन अंतर्गत लावण्यात येणारे अनधिकृत जाहिराती संबंधी कारवाई करतांना प्रत्येक जाहिरातींचे डिजीटल छायाचित्र घ्यावयाचे आहे. व पुढील कारवाई करीता ते जतन करुन पोलीस विभागाकडे कारवाई करीता सादर करावयाचे आहेत. तसेच आवश्यक असल्यास पंचनामा करावयाचा आहे.

VII. कुठल्याही विशेष सण अथवा वाढदिवसानिमीत्य लावलेले अनधिकृत फलक हे तत्पुर्वी अथवा सदर दिवशीच काढुन संबंधितांवर विरुपण कायद्यांतर्गत कारवाई सहाय्यक आयुक्त यांना करावयाची आहे. तसेच केलेल्या संपुर्ण कारवाईचा अहवाल उपआयुक्त (सामान्य) यांचे कडे सादर करावयाचा आहे.

३) अमरावती महानगरपालिके अंतर्गत लावण्यात येणा-या अनधिकृत जाहिरातीं बाबत शहरातील नागरीकांना तक्रार घेणे व तत्सम कारवाई करीता संगणक विभागामार्फत एक मोबाईल ॲप (My Amravati) कार्यान्वीत करण्यात आले आहे. सदर ॲप चे माध्यमातुन नागरीकांचे तक्रारी स्विकारुन तातडीने सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत तक्रारींचे आधारे कारवाई करावयाची आहे.

अमरावती महानगरपालिका AMC अमरावती

वरील प्रमाणे निर्गमीत करण्यात आलेले आदेशानुसार उपआयुक्त (सामान्य) व सर्व सहाय्यक आयुक्त यांनी मा.उच्च न्यायालयाचे मुंबई खंडपिठाने दि.०६.०८.२०१४ व दि.३१.०१.२०१७ रोजी पारीत केलेले आदेशाप्रमाणे कारवाई करावयाची आहे. सदर आदेशांची प्रत www.bombayhighcourt.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावी.

अमरावती महानगरपालिका AMC अमरावती

(डॉ.प्रविण आष्टीकर)
**आयुक्त**
**महानगरपालिका,अमरावती.**

**प्रत,**

**१. उपआयुक्त (सामान्य),**
**२. सहाय्यक आयुक्त,**
**झोन क्रमांक १,२,३,४ व ५**

प्रतिलीपी :-

१) **मा.जिल्हाधिकारी,अमरावती** यांचे माहिती करीता सविनय सादर.
२) **मा.पोलीस** आयुक्त,**अमरावती** यांचे माहिती करीता सविनय सादर.
३) **अतिरीक्त** आयुक्त,महानगरपालिका,अमरावती
४) अधिक्षक,बाजार व परवाना विभाग,महानगरपालिका,अमरावती.
५) अतिक्रमण पथक प्रमुख,महानगरपालिका,अमरावती.
६) वरिष्ठ पोलीस निरीक्षक,------------------- पोलीस स्टेशन,अमरावती.
७) कार्यालय अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग,महानगरपालिका,अमरावती.